# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपिल क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.१४५८/२०१८/अहिल्यानगर मधील शास्तीचे प्रकरण**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.गुलाबराव भादू पवार, रा.एकनाथ नगर, केडगांव, अहिल्यानगर ता.जि.अहिल्यानगर. | सरकारी कामगार अधिकारी, सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, आशिष बिल्डींग, सथ्था कॉलनी, स्टेशन रोड, अहिल्यानगर ता.जि.अहिल्यानगर. | सहाय्यक कामगार आयुक्त, सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, आशिष बिल्डींग, सथ्था कॉलनी, स्टेशन रोड, अहिल्यानगर ता.जि.अहिल्यानगर. |

## विवेचन

उपरोक्त द्वितीय अपिलासंदर्भात अपिलार्थी यांनी दिनांक १७/१०/२०१७ रोजीच्या माहिती अर्जान्वये दि.२०/११/२०१६ ते दि.२१/११/२०१६ या कालावधीतील कायनेटिक इंजि.लि.कंपनीतील कामगारांचे दि.२०/११/२०१६ रोजी सुरु होणारी प्रथम शिफ्ट, दुसरी शिफ्ट व दि.२१/११/२०१६ रोजी संपणारी तिसरी शिफ्ट मधील कामगारांचे हजेरीपत्रक / हजेरी रजिस्टरची प्रमाणित प्रत कोर्ट कामासाठी मा.असिस्टन जनरल मॅनेजर, पर्सनल डिपार्टमेन्ट श्री.गुळवे साहेब यांना दि.०९/०९/२०१६ रोजी माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये त्यांना अर्ज रजिस्टर पोस्टाने पाठविलेला असून यासंदर्भिय ३० दिवस झालेले असून रजि.पाकीट त्यांनी ताब्यात घेतले आहे. कोर्ट कामासाठी आपणाद्वारे मला हजेरीपत्रक मिळावे अशी माहिती मागितली होती. सदर माहिती अर्जाच्या संदर्भात दाखल उपरोक्त द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिनांक ०६/०६/२०२२ रोजी खालीलप्रमाणे आदेशित केले होते.

तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, सथ्था कॉलनी, आशिष बिल्डींग, स्टेशन रोड, अहिल्यानगर श्री.नितीन पाटणकर यांनी अपिलार्थी यांनी दि.१८/१२/२०१७ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज व्यवस्थापक, कायनेटीक इंजिनिअरींग कं.प्रा.लि.अहिल्यानगर या खाजगी संस्थेकडे वर्ग करावा असा अयोग्य निर्णय पारित केला. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.केंमाअ २००७/११८२/प्र.क्र.१६५/०७/०६, दि.१२/१२/२००७ च्या शासन परिपत्रकाचे अनुपालन केले नसल्याने त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.केंमाअ २००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा आदेश प्राप्तीच्या ७ दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहित धरुन शासन परिपत्रक दि.३१/०३/२००८ नुसार कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम केले जाऊ शकतील याची नोंद घ्यावी.

२. सदर आदेशास अनुसरुन तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, अहिल्यानगर श्री.नितीन पाटणकर यांनी आयोगाकडे दि.१२/०९/२०२२ अन्वये लेखी खुलासा सादर केला असून सदर खुलाशात त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी त्यांचा माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दि.१७/१०/२०१७ चे अनुषंगाने कायनेटीक इंजिनिअरींग कं.प्रा.लि. अहिल्यानगर या संस्थेकडून दि.२०/११/२०१६ रोजी सुरु होणा-या प्रथम पाळी, द्वितीय पाळी व दि.२१/११/२०१६ रोजी संपणा-या तृतीय पाळीतील कामगारांचे हजेरी रजिस्टरची प्रमाणित प्रत मागितलेली होती. परंतू सदर माहिती उत्तरवादी क्र.१ यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे उत्तरवादी क्र.१ यांनी त्यांचे दि.१६/११/२०१७ चे पत्राद्वारे अपिलार्थी यांना कळविलेले होते. तथापि सदर प्रकरणात अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार दि.१८/१२/२०१७ रोजी उत्तरवादी क्र.२ यांचेकडे प्रथम अपिल दाखल केलेले होते.

सदर प्रकरणात मी उत्तरवादी क्र.२ यांनी दि.१७/०१/२०१८ रोजी अपिलार्थी व उत्तरवादी क्र.१ यांना बोलावून सुनावणी घेतलेली होती. सुनावणीचे वेळी उत्तरवादी क्र.१ यांनी अपिलार्थी यांना दिलेले उत्तर समाधानकारक असल्याचे माझ्या निदर्शनास आले व ही बाब मी अपिलार्थी यांना समजावून सांगितली. तसेच संबंधित कंपनीला माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदी लागू होत नाहीत असेही निवेदन केले. परंतू अपिलार्थी यांनी सदर माहिती त्यांना मिळावी अशी आग्रहाची भूमिका घेतलेली होती. तसेच सदर अर्ज सरकारी कार्यालयामार्फत संबंधित कंपनीला वर्ग केल्यास कंपनी सदरची माहिती मला देऊ शकेल व मला आपणामार्फत सदर माहिती उपलब्ध होईल अशी विनंती अपिलार्थी यांनी केलेली होती. तथापि कार्यालयात उपलब्ध नसणारी माहिती त्रयस्थांकडून मागवून ती अपिलार्थीला उपलब्ध करुन देण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये नसल्यामुळे व अर्जदाराची आग्रही भूमिका कायमच असल्यामुळे अपिलार्थी यांचा माहिती अधिकार कायद्यावरील विश्वास वाढावा व माहिती अधिकार कायद्यावरुन विरोधी मत तयार होऊ नये तसेच सरकारी कार्यालयीन कामाबाबत देखील विश्वासाची भावना वृध्दींगत व्हावी, ही सद्भावना व प्रामाणिक व शुध्द हेतू विचारात घेऊन सदर प्रकरण व्यवस्थापक, कायनेटीक इंजिनिअरींग कं.प्रा.लि. अहिल्यानगर यांचेकडे माझ्या दि.१७/०१/२०१८ चे आदेशानुसार वर्ग करण्यात आले. ज्या आस्थापना माहिती अधिकार अधिनियमाच्या कक्षेत बसत नाहीत त्यांना माहिती अधिकारात मागविलेली माहिती पुरविता येत नाही याची मला पूर्णपणे जाणीव आहे. तथापि अपिलार्थी यांचेबाबत केवळ सहानुभूतीपूर्वक विचार करुन मी सदर आदेश पारित केलेला होता.

सदर प्रकरणात अपिलार्थी यांचा अर्ज कायनेटीक इंजिनिअरींग कं.प्रा.लि.अहिल्यानगर यांचेकडे वर्ग करण्याचा निर्णय मी केवळ अपिलार्थी यांचेबाबत सद्भावनेने घेतलेला होता. तरी माझेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.केंमाअ २००७/११८२/प्र.क्र.१६५/०७/०६, दि.१२/१२/२००७ चे अनुपालन न केल्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्र.केंमाआ २००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ अन्वये कोणतीही कार्यवाही प्रस्तावित करण्यात येऊ नये, ही विनंती.

३. प्रस्तुत अपिलासंदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही कायनेटीक इंजिनिअरिंग कं.प्रा.लि. अहिल्यानगर या खाजगी संस्थेशी संबंधित असून सदरची माहिती सहायक कामगार आयुक्त यांचे कार्यालय, अहिल्यानगर यांचेकडे असण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या दि.१७/१०/२०१७ च्या माहिती अर्जास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.१६/११/२०१७ च्या पत्रान्वये कार्यालयात कंपनीमधील कामगारांचे हजेरीपत्रक ठेवले

जात नाही तरी माहिती निरंक समजण्यात यावी असे कळविले आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी दि.१८/१२/२०१७ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, अहिल्यानगर श्री.नितीन पाटणकर यांनी कायनेटिक इंजिनिअरिंग कं.प्रा.लि. ही खाजगी संस्था असून संबंधित कंपनीला माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतूदी लागू होत नाहीत तथापि अपिलार्थी यांनी सदर माहिती त्यांना मिळावी तसेच सदर अर्ज सरकारी कार्यालयामार्फत संबंधित कंपनीला वर्ग केल्यास कंपनी सदरची माहिती मला देऊ शकेल व मला आपणामार्फत सदर माहिती उपलब्ध होईल अशी अपिलार्थी यांनी आग्रहाची भूमिका घेतल्यामुळे आणि कार्यालयात उपलब्ध नसणारी माहिती त्रयस्थांकडून मागवून ती अपिलार्थीला उपलब्ध करुन देण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये नसल्यामुळे अपिलार्थी यांचा माहिती अधिकार कायद्यावरील विश्वास वाढावा व माहिती अधिकार कायद्यावरुन विरोधी मत तयार होऊ नये तसेच सरकारी कार्यालयीन कामाबाबत देखील विश्वासाची भावना वृध्दींगत व्हावी, ही सद्भावना व प्रामाणिक व शुध्द हेतू विचारात घेऊन सदर प्रकरण व्यवस्थापक, कायनेटीक इंजिनिअरींग कं.प्रा.लि. अहिल्यानगर यांचेकडे माझ्या दि.१७/०१/२०१८ चे आदेशानुसार वर्ग करण्यात आले. यावरुन तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, अहिल्यानगर श्री.नितीन पाटणकर यांना जी माहिती, माहिती अधिकार अधिनियमाच्या कक्षेत बसत नाहीत त्यांना माहिती अधिकारात मागविलेली माहिती पुरविता येत नाही याची पूर्णपणे जाणीव असल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थी यांचेबाबत केवळ सद्भावनापूर्वक विचार करुन त्यांनी सदर प्रथम अपिलाचा आदेश पारित केलेला असल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २१ अंतर्गत सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण देण्यात आलेले आहे. सबब, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, अहिल्यानगर श्री.नितीन पाटणकर यांनी आयोगाकडे सादर केलेला खुलासा समर्थनीय असल्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्रमांक केंमाअ २००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दिनांक ३१/०३/२००८ नुसार कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, अहिल्यानगर श्री.नितीन पाटणकर यांनी आयोगाकडे केलेला खुलासा समाधानकारक असल्यामुळे मान्य करण्यात येऊन त्यांच्याविरुध्द प्रस्तावित कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

---

प्रति,

तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, अहिल्यानगर (श्री.नितीन पाटणकर, कामगार उपआयुक्त, कामगार उपआयुक्त यांचे कार्यालय, टेलिफोन टॉवरच्या बाजूला, पवन झेरॉक्सच्या मागे, कॅम्प रोड, अमरावती ता.जि.अमरावती.)

---

जावक क्र. ५८४४ , दिनांक :- 15 JUL 2025